# विद्या प्रतिष्ठान महाविद्यालय व क्विक हील फाउंडेशनमध्ये करार

बारामती, ता. २८ : विद्या प्रतिष्ठान कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय व क्विक हिल फाउंडेशन यांच्यामध्ये 'कमवा आणि शिका' योजनेसाठी सामंजस्य करार झाला आहे.

या करारावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे व क्विक हिल फाउंडेशनच्या सीएसआर समितीने स्वाक्षरी केली. यातून विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य व व्यावहारिक अनुभव प्रदान होईल. शिक्षक आणि



**बारामती :** सामंजस्य कराराप्रसंगी उपस्थित मान्यवर.

समन्वयकांसाठी प्रशिक्षण सत्रे व तांत्रिक मार्गदर्शन वाढवतील. याचा उद्देश शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे ज्ञान देणे व सामाजिक साक्षर करणे आहे.

क्विक हिल फाउंडेशन प्रगत सायबर सुरक्षा उपायांसाठी ओळखले जाते. सीएसआर शाखा सामाजिक सायबर सुरक्षा करण्यावर लक्ष केंद्रित करते. 'कमवा आणि शिका' ही योजना विद्यार्थ्यांना उद्योग-विशिष्ट कौशल्ये सुसज्ज करण्यासाठी उपयुक्त ठरेल असा विश्वास व्यक्त केला.

या वेळी प्राचार्य डॉ. शिंदे, उपप्राचार्य डॉ. श्यामराव घाडगे, उपप्राचार्य डॉ. लालासाहेब काशीद, गजानन जोशी, किशोर ढाणे, विभाग प्रमुख महेश पवार यांचे मार्गदर्शन लाभले उपक्रमाच्या समन्वयक सलमा शेख तर विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून साहिल तावरे काम करणार आहे.

करार यशस्वी होण्यासाठी गौतम कुदळे, विशाल शिंदे, अनिल काळोखे, पुनम गुंजवटे, अक्षय भोसले अक्षय शिंदे, वैशाली पेंढारकर, कांचन खिरे, रवी जुन्नरकर यांनी परिश्रम घेतले.